# मराठी साहित्य संमेलन आणि महिला अध्यक्षांचे प्रमाण

जयश्री कुलकर्णी

**शोधसारांश**

ग्रंथकार संमेलन ते अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अशी संमेलन परंपरेची वाटचाल आता शताब्दीपर्यंत येऊन ठेपली आहे. साहित्य संमेलनांच्या इतिहासामध्ये केवळ सहा महिलांनाच संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान मिळाला आहे.

पुढील वर्षी शंभरावे साहित्य संमेलन होत असताना या शंभर साहित्य संमेलनात केवळ सहा जणींनाच हा मान मिळाला आहे, याची कारणे नेमकी काय आहे? या प्रश्नाचा वेध घेणे महत्त्वाचे ठरते.

**मुख्य शब्द :** संमेलन, साहित्य, महिला अध्यक्ष, लेखिका, ग्रंथकार, मराठी.

## प्रस्तावना

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने सारस्वतांचा मेळा भरतो आणि वाङ्मयीन विचारांची देवाणघेवाण व्हावी या संमेलनाच्या आयोजनामागचा मुख्य उद्देश असतो. गेल्या काही वर्षांपासून साहित्यबाह्य विषयांनी संमेलन गाजत असल्याने हा उद्देश सफल होतो का हा प्रश्न उपस्थित होतो. संमेलनाध्यक्षाची बिनविरोध निवड हा चांगला पायंडा पडला असला तरी संमेलनाला मिळणारे सरकारी अनुदान आणि संमेलनाच्या व्यासपीठावरील राजकीय नेत्यांची भाऊगर्दी हा नेहमी चर्चेचा विषय ठरतो. गर्दी खेचण्याच्या दृष्टिकोनातून होणारे मनोरंजनपर कार्यक्रम या गोष्टी ध्यानात घेतल्या तर संमेलनातून वाङ्मयीन विचार किती पुढे जातो? मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरही ‘साहित्य संमेलनांची निष्पत्ती नेमकी काय?’ संमेलनाध्यक्षाच्या भाषणावर किती चिंतन होते? महिला अध्यक्षांचे प्रमाण अवघे सहा टक्केच का आहे? हा संशोधनाचा विषय ठरतो. या संमेलनामध्ये महिला अध्यक्षांचे प्रमाण अवघे सहा टक्के आहेत, याची कारणे नेमकी काय आहे? हा प्रश्न आज अनेक लिहिणार्या लेखिकांना पडतो आहे. स्त्रिया लेखनात कमी पडतात की, त्यांची दखलच घेतली जात नाही? किंवा लेखिका या साहित्य व्यवहारात कराव्या लागणार्या राजकारणात कमी पडतात का? हाही विचार मनात येतो. कुसुमावती देशपांडे, दुर्गा भागवत, शांता शेळके या बिनविरोध निवडून आल्या होत्या. विजया राजाध्यक्ष यांना निवडणूक लढवावी लागली होती. साहित्य मंडळाने अध्यक्षपद सन्माने देणे सुरु केले, तेव्हा अध्यक्षपदाचा पहिला बहुमान अरुणा ढेरे यांना तर, त्यानंतरच्या संमेलनात तारा भवाळकर यांना दिला गेला. महिला अध्यक्षांचे प्रमाण अवघे सहा टक्के असून हे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी निश्चितच भूषणावह नाही.

### 1) ग्रंथकार संमेलन

ग्रंथ प्रसाराला उत्तेजन देण्याच्या उद्देशातून तसेच त्यावर एकत्र येऊन विचारविनिमय करण्याच्या हेतूने न्या. महादेव गोविंद रानडे यांनी लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांच्या सहकार्याने 1878 च्या मे महिन्यात ग्रंथकारांना एकत्र

आणण्याचे ठरविले. त्यासाठीचे आवाहन त्या वेळी ज्ञान प्रकाश दैनिकाच्या 7 फेब्रुवारीच्या अंकामधे प्रसिद्ध झाले होते. या आवाहनानुसार 11 मे 1878 रोजी पुण्याच्या हिराबागेत मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन भरले. हीच पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनची नांदी ठरली. या संमेलनाचे अध्यक्षपद न्या. म. गो. रानडे यांनीच भूषविले होते. या संमेलनापूर्वी म्हणजे 1865 मध्ये न्या. रानडे यांनी मराठीत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा आढावा घेतला होता. त्यानुसार 431 गद्य आणि 230 पद्य पुस्तकांची निर्मिती झाल्याचे दिसते.
त्यानंतर सात वर्षांनी म्हणजे 1885 मध्ये दुसरे ग्रंथकार संमेलनही पुण्यातच भरले. पुणे सार्वजनिक सभेने भरविलेल्या या संमेलनाला सुमारे सव्वाशे नामवंत ग्रंथकारांची उपस्थिती होती. त्यानंतर जवळपास वीस वर्षांनी तिसरे ग्रंथकार संमेलन 1905 च्या मे महिन्यात सातारा येथे भरले. लोकमान्य टिळक यांचे एक सहकारी आणि साताऱ्यातील प्रसिद्ध वकील र. पां. ऊर्फ दादासाहेब करंदीकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. 23 मे च्या 'केसरी'त या संमेलनाचा त्रोटक वृत्तान्त प्रसिद्ध झाला होता. साताऱ्यापाठोपाठ चौथे ग्रंथकार संमेलन पुण्यात 27 आणि 28 मे 1906 रोजी सदाशिव पेठेतील नागनाथ पाराजवळच्या मळेेकर वाड्यात भरले होते. हे संमेलन आधीच्या संमेलनांपेक्षा यशस्वी व विधायक स्वरूपाचे झाले. प्रसिद्ध कवी, ग्रंथकार आणि भाषांतरकार गोविंद वासुदेव कानिटकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. अनेक मान्यवर ग्रंथकार मंडळी संमेलनासाठी एकत्र आलेली होती. निबंध वाचन, भाषणे, ठराव यामुळे संमेलन दोन दिवस गाजले होते. या संमेलनाच्या समारोपात साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद या आद्य साहित्य संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली. लोकमान्य टिळक यांनी त्याला अनुमोदन दिले आणि ग्रंथकार संमेलनाच्या आयोजनातून आद्य साहित्य संस्थेचा जन्म झाला.

2) साहित्य महामंडळाची स्थापना

स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्रात अनेक मराठी साहित्य संस्था काम करीत होत्या. या संस्थांच्या ध्येय-धोरणांमध्ये सुसूत्रता आणावी, त्यांनी एकमेकांना सहकार्य करावे, यासाठी एक मध्यवर्ती साहित्य संस्था स्थापन करावी आणि त्या संस्थेने सर्व साहित्य संस्थांचे नेतृत्व करावे असा विचार सर्वप्रथम 1951 मध्ये कारवार येथे भरलेल्या ग्रंथकार संमेलनात मांडण्यात आला. मात्र, तो प्रत्यक्षात येण्यासाठी 1960 उजाडावे लागले. अनेकांना त्या कल्पनेचा पाठपुरावा करावा लागला आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ या संस्थेची रीतसर स्थापना झाली. साहित्य महामंडळाच्या स्थापनेपासून आजपर्यंत महामंडळाने साहित्य संमेलनाच्या आयोजनाची भूमिका स्वीकारली.

3) साहित्य महामंडळाची रचना

मुंबई मराठी साहित्य संघ, पुण्यातील महाराष्ट्र साहित्य परिषद, नागपूर येथील विदर्भ साहित्य संघ आणि छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) येथील मराठवाडा साहित्य परिषद या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या चार संस्थापक संस्था असून त्या कायमस्वरूपी घटक संस्था आहेत. या चारही संस्थांचे प्रमुख तीन पदाधिकारी महामंडळाचे सदस्य असतात. बृहन्महाराष्ट्रातील तेलंगणा (पूर्वीचे हैदराबाद) येथील मराठी साहित्य परिषद, गोवा येथील मराठी साहित्य सेवा मंडळ, गुलबर्गा येथील कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद आणि बिलासपूर येथील छत्तीसगढ मराठी साहित्य परिषद (बिलासपुर) या साहित्य संस्थांना संलग्न संस्था म्हणून मान्यता मिळते. याखेरीज बडोदा येथील मराठी वाङ्मय परिषद या संस्थेला समाविष्ट संस्था म्हणून मान्यता देण्यात आली

आहे. या पाचही संस्थांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी महामंडळाचा सदस्य असतो. महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद आणि विदर्भ साहित्य संघ या घटक संस्थांकडे साहित्य महामंडळाचे कार्यालय तीन वर्षांच्या मुदतीसाठी असते.

4) साहित्य महामंडळाची उद्दिष्टे

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या क्षेत्रांत कार्य करणार्या संस्थांच्या धोरणांमध्ये आणि कामामध्ये एकसूत्रीपणा निर्माण करणे, मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी आणि संवर्धनासाठी कार्य करणे ही अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची उद्दिष्टे आहेत. त्यानुसार दरवर्षी मराठी भाषिक जनतेचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करणे, हे महामंडळाचे एक काम आहे. संमेलनाला जोडून भरणार्या ग्रंथ प्रदर्शनामध्ये पुस्तकांची विक्रीही प्रचंड प्रमाणात होते. मराठी भाषेचा उत्सव भव्य आणि उत्साही होत असल्याचे हे द्योतक झाले आहे.

5) मराठीला अभिजात भाषेचा दर्जा

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव दाखल करून दहा वर्षे झाली तरी लालफितीमध्ये अडकून पडला होता. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नेतृत्वाखाली पंतप्रधानांना एक लाख नागरिकांच्या सहीची पत्रे पाठवून झाली. दिल्लीमध्ये धरणे आंदोलन करण्यात आले. अभिजात भाषेची मान्यता या विषयाला रेटा देण्यासाठी 98 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन दिल्लीमध्ये करण्याचा निर्णय साहित्य महामंडळाने घेतला. अखेरीस 2024 मध्ये घटस्थापनेच्या दिवशी मराठीला अभिजात दर्जा देण्याची घोषणा केंद्र सरकारने केली. अभिजात भाषेचा दर्जा जाहीर झाल्यानंतर झालेल्या या संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. मराठीला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा ही आजपर्यंतच्या साहित्य संमेलनांची फलश्रुती ठरली.

6) महिला अध्यक्षांचे प्रमाण अवघे सहा टक्के

सर्वच प्रांतामध्ये महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहेत. साहित्य क्षेत्र त्याला अपवाद नाही. मात्र, साहित्य संमेलनांच्या इतिहासामध्ये केवळ सहा महिलांनाच संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान मिळाला आहे. एक तर निवडणूक लढविणे आणि मतदानाचे आवाहन करणे हा प्रवास न झेपणारा असल्याने लेखिका त्या वाटेला गेल्याच नाहीत, असे म्हणावे लागेल. ज्यांनी निवडणूक लढविली त्यांना यश संपादन करणे अवघड गेले. महामंडळ अस्तित्वात येण्यापूर्वी कुसुमावती देशपांडे या एकच लेखिका अध्यक्ष झालेल्या होत्या. महामंडळाच्या स्थापनेनंतर दुर्गा भागवत, शांता शेळके, विजया राजाध्यक्ष, डॉ. अरुणा ढेरे आणि देशाची राजधानी असलेल्या दिल्लीमध्ये नुकत्याच झालेल्या संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर अशा सहा लेखिका अध्यक्ष झालेल्या आहेत.

7) घटनादुरुस्ती

2019 चे संमेलन आणि संमेलनाध्यक्षाची निवड ही ऐतिहासिक घटनाच होती. कारण साहित्य महामंडळाने या वर्षीपासून घटनादुरुस्ती केली होती. अध्यक्षपद सन्मानाने देण्याचा साहित्य महामंडळातर्फे निर्णय घेण्यात आला. निवडून येणे यापेक्षा उत्तम साहित्यनिर्मिती करणार्या साहित्यिकातून अध्यक्षाची निवड करण्याचा निर्णय घेण्यात

आला. संमेलनाध्यक्षपद सन्मानाने देण्याचा निर्णय झाल्यानंतर पहिल्याच वर्षी डॉ. अरुणा ढेरे यांना संमेलनाध्यक्ष होण्याचा मान मिळाला.

8) अध्यक्ष लेखिका

कुसुमावती देशपांडे यांचा नवकथाकाळापूर्व काळातील वैशिष्ट्यपूर्ण कथा लिहिणार्या लेखिका म्हणून उल्लेख केला जातो. त्यांच्या ललितलेखनातून तरल कविवृत्ती आणि प्रौढ चिंतनशीलता दिसून येते.

दुर्गा भागवत यांची मराठी साहित्यात सृजनशील साहित्यकार आणि संशोधक अशी ओळख आहे. तत्त्वचिंतक या नात्याने त्यांनी मराठी चिंतनविश्व संपन्न बनवले आहे. अनेक भाषांमध्ये पारंगत असणार्या या विदुषीने बौद्ध पाली साहित्याचा चिकित्सक अभ्यास करून जातक कथा मराठीत आणल्या.

गदिमांनंतर समर्थ गीतकार म्हणून स्थान मिळवलेल्या शांता शेळके यांचे स्वतंत्र असे नाव आहे. त्या कवयित्री, गीतकार, लघुनिबंधकार होत्या. त्यांच्या गीतांनी उभ्या महाराष्ट्राला वेड लावले.

मराठी साहित्यात चौफेर विषयावर लेखन, समीक्षक व स्त्रीवादी लेखिका म्हणून डॉ. विजया राजाध्यक्ष परिचित आहेत.

डॉ. अरुणा ढेरे संशोधक, कवयित्री, उत्तम वक्त्या आणि साहित्यात विविधांगी लेखन करणार्या, इतिहासाकडे पाहण्याची स्वतंत्र दृष्टी असणार्या, परंपरेचे नवे अर्थ लावत, चिकित्सा करणार्या एक संवेदनशील लेखिका.

लोकसंस्कृती आणि नाटक या विषयांच्या अभ्यासक म्हणून तारा भवाळकर साहित्य क्षेत्राला परिचित आहेत.

9) विचारांची दहशत

इंदिरा गांधींनी 26 जून 1975 रोजी राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली तेव्हा स्वातंत्र्योत्तर भारतातील नवे पर्व सुरू झाले होते. त्या पार्श्वभूमीवर कराड (जि.सातारा) येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून दुर्गा भागवत यांनी केलेले भाषण अनेक कारणांनी गाजले होते.

ते भाषण त्यांच्या निर्भय आणि स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध आहे. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर राजकारण्यांना स्थान नसावे, असे परखड मत त्यांनी मांडले होते.

हा करारी बाणा पाहून प्रेक्षकांमध्ये पहिल्या रांगेत बसून दुर्गाबांईंचे अध्यक्षीय भाषण ऐकण्याचा सुसंस्कृतपणा यशवंतरावांनी दाखविला होता.

यवतमाळ 2019 येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनच्या वेळी इंग्रजी साहित्यिक नयनतारा सहगल यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार होते. सहगल या सरकारच्या विरोधात मत व्यक्त करतील या भीतीपोटी त्यांना उद्घाटक म्हणून दिलेले निमंत्रण साहित्य महामंडळाकडून मागे घेतले गेले. ही घटना म्हणजे या व्यासपीठावरून व्यक्त केलेल्या विचारांचा प्रभाव जनतेवर पडतो, हे शासनाला मान्य आहे, याचेच उदाहरण म्हणावे लागेल. त्यानंतर आता सातारा येथे होणार्या 99 व्या संमेलनात डॉ. मृदुला गर्ग या ज्येष्ठ लेखिकेला उद्घाटन करण्याचा मान देण्यात आला आहे. विचार पटतील अथवा न पटतील ते मांडण्याची मुभा आणि ऐकण्याची तयारी दाखवली जाणे महत्त्वाचे.

Mahratta
Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

10) महिला संमेलनाध्यक्षाची सूची

| क्र. | वर्ष | स्थळ | महिला संमेलनाध्यक्ष |
|---|---|---|---|
| 1 | 1961 | ग्वाल्हेर | कुसुमावती देशपांडे |
| 2 | 1975 | कराड | दुर्गा भागवत |
| 3 | 1996 | आळंदी | शांता शेळके |
| 4 | 2001 | इंदूर | विजया राजाध्यक्ष |
| 5 | 2019 | यवतमाळ | अरुणा ढेरे |
| 6 | 2025 | दिल्ली | तारा भवाळकर |

.......................................................

## निष्कर्ष

समाज अधिक सुसंस्कृत, विचारी, विज्ञाननिष्ठ, विवेकवादी होण्यास या साहित्य संमेलनामुळे मदत होते. संमेलनातील नाविन्यपूर्ण कार्यक्रमांद्वारे मानवी जीवनमूल्यांचे व विचारांचे पोषण होते. खरं तर गेल्या शंभर वर्षांचा वाङ्मयीन पट पाहिला तर मराठी साहित्याला स्त्रियांनी महत्त्वाचं योगदान दिलेलं आहे, हे कोणत्याही सुज्ञ वाचकाच्या लक्षात येतं. व्यासपीठावरून सुनावण्याचा बाणेदारपणा लेखिकांमध्ये आहे, हे अमान्य करता येत नाही. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचा मान मिळालेल्या कुसुमावती देशपांडे, दुर्गा भागवत, शांता शेळके, विजया राजाध्यक्ष, डॉ. अरुणा ढेरे आणि डॉ. तारा भवाळकर या लेखिका साहित्यात लक्षणीय कामगिरी करणार्या ठरल्या आहेत, यांच्या व्यतिरिक्त अनेक लेखिका आहेत, ज्यांचे साहित्यक्षेत्रात मोलाचे योगदान आहे. शंभर वर्षांत काही होऊन गेलेल्या लेखिका ईरावती कर्वे, पद्मा गोळे, मालती बेडेकर, कमल देसाई, गौरी देशपांडे आणि आता आशा बगे, प्रभा गणोरकर, नीरजा, मोनिका गजेंद्रगडकर अशी अनेक नावे घेता येतील ज्यांचं लेखन साहित्यविश्व समृद्ध करत आहे. संमेलनाध्यक्षपद सन्मानाने देण्याचा साहित्य महामंडळाच्या निर्णयामुळे भविष्यात साहित्यसंमेलनासाठी महिला अध्यक्षपदाचा विचार होईल अशी अपेक्षा करता येऊ शकेल.

.........................................................................................

## संदर्भ सूची

मराठी भाषा विभाग, हीीिंििीं://ारीरींहळ.र्सीं.ळप/
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि आम्ही पाच जणी (लेखक : मच्छिंद्र नागरे)
केसरी वृत्तपत्र 23 मे 1905